**<u>फौ. किरकोळ अर्ज क्र. २०७३/२०२१ मधील नि. १ खालील आदेश</u>**

१. यातील अर्जदार यांचे मालकीची टी.व्ही.एस. कंपनीची ॲटोरिक्षा क्र. एम.एच.१२/एच.सी. २१७४ ही हिंजवडी पोलीस स्टेशन पुणे यांनी गु.र.नं. ३६५/२०२१ चे कामी जप्त केली आहे. त्यामुळे अर्जदाराने सदर जप्त मुद्देमाल परत मिळणेसाठी अर्ज दाखल केला आहे.

२. सरकारी वकील व तपासी अधिकारी यांनी जप्त वाहन अर्जदाराला परत करण्यास नाहरकत दिली.

३. अर्जदाराने अर्जासोबत शपथपत्र (नि.४) दाखल केल्याने तिच्या कथनाला पुष्टी मिळते. अर्जदाराने आर.सी. बुकची प्रत व आधारकार्डची प्रत, प्रथम खबर व रिक्षाचे परमिट इ. कागद नि. ३ च्या यादीसोबत दाखल केले आहेत. दाखल दस्ताऐवजावरुन जप्त मुद्देमाल अर्जदाराच्या मालकीचा असल्याचे दिसून येते. अर्जदारा व्यतिरिक्त कोणीही जप्त मुद्देमालाची मागणी केलेली नाही.

४. अर्जदारावर काही अटी लादल्यास आणि दिशानिर्देश दिल्यास ते जप्त मुद्देमालाची काळजी घेवून पुरव्याकामी आवश्यकता असल्यास न्यायालयासमोर हजर करु शकतो. जप्त मुद्देमाल पोलीस ठाण्यात ठेवल्यास ते खराब होण्याची संभाव्यता आहे. त्याऐवजी ते अर्जदारास सुपूर्तनाम्यावर दिल्यास त्याची निगा राखली जाईल व वापरात आणला जाईल. करिता खालील आदेश –

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजूर.

२. हिंजवडी पोलीस स्टेशन पुणे यांनी गु.र.नं. ३६५/२०२१ मध्ये जप्त मुद्देमाल टी.व्ही.एस. कंपनीची ॲटोरिक्षा क्र. एम.एच. १२/एच.सी. २१७४ ही अर्जदाराच्या ताब्यात देण्यात यावे.

३. अर्जदारांनी रक्कम रुपये ३०,०००/– चे सुरक्षा बंधपत्र लिहून द्यावे.

४. तपासी अंमलदार यांनी सदर मुद्देमालाचा पंचनामा करावा व अर्जदाराच्या खर्चाने त्याचे छायाचित्र काढून घ्यावे.

५. अर्जदाराने सदर मुद्देमालाचे हस्तांतरण, गहाण, दान, परिवर्तन इत्यादि व्यवहार करु नयेत. तसेच, न्यायालय ज्यावेळी त्याची मागणी करेल त्यावेळी हजर करावे.

पुणे
दिनांक : २६/०७/२०२१

(श्र.जि. डोलारे )
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी
फौजदारी न्यायालय क्र. ६, पुणे